राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२३-२४

(प्राथमिक गट)

---

**विविध क्षेत्रातील उद्याचे नेतृत्व शालेयस्तरापासूनच विकसित करण्यासाठी:**

# आयकॉनिक क्लब

---


■ उपक्रम सादरकर्ता ■

**श्री. राजकिरण आत्माराम चव्हाण**

श्री समर्थ विद्यामंदिर, सोलापूर



## वैयक्तिक माहिती

- **शिक्षकाचे नाव :** श्री राजकिरण आत्माराम चव्हाण.
- **शाळेचे नाव :** श्री समर्थ विद्यामंदिर, सोलापूर.
- **शाळेचा पत्ता :** शास्त्री नगर, दक्षिण सदर बझार, सोलापूर- ४१३ ००३
- **पदनाम :** सहशिक्षक
- **शैक्षणिक पात्रता :** M.A., D.Ed., DSM, MCJ, CPCT, GVD.
- **एकूण सेवा :** १७+ वर्षे
- **ई मेल आयडी :** srujanrajkiran@gmail.com
- **ब्लॉग :** www.srujanshilshikshak.blogspot.in
- **वेबसाईट :** www.srujanshilshikshak.com
- **युट्युब चॅनलचे नाव :** सृजनशील शिक्षक
- **मोबाईल क्रमांक :** ७७७४ ८८ ३३ ८८

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक | ०४ |
| २ | उपक्रमाची गरज व महत्त्व | ०४ |
| ३ | उपक्रमाची उद्दिष्टे | ०७ |
| ४ | नवोपक्रमाचे नियोजन | ०८ |
| ५ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | १३ |
| ६ | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती (उद्दिष्टानुसार) | ३७ |
| ७ | समारोप | ३८ |
| ८ | संदर्भसूची व परिशिष्टे | ४१ |

## १. नवोपक्रमाचे शीर्षक

विविध क्षेत्रातील उद्याचे नेतृत्व शालेयस्तरापासूनच विकसित करण्यासाठी : **आयकॉनिक क्लब**

## २. उपक्रमाची गरज आणि महत्त्व

**आयकॉनिक क्लब** हा श्री समर्थ विद्यामंदिर, सोलापूर या प्राथमिक शाळेमध्ये राबवण्यात आला. ही शाळा सोलापुरातील शास्त्री नगर या झोपडपट्टीवजा परिसरात आहे. तसे पाहिले तर एका बाजूला सोलापूर हे भारतातील **'स्मार्ट सिटी'** म्हणून उदयाला आलेले शहर, पण शास्त्रीनगर व आजूबाजूचा परिसर जर पाहिला तर तो आर्थिकदृष्ट्या मागास, कमकुवत व दुर्बल घटकांचा आहे. या ठिकाणी हिंदी, उर्दू, मराठी, कन्नड, तेलुगू, कुंचिकोरवी अशा विविध भाषा व बोली बोलल्या जातात. परिसराची लोक मोलमजुरी करून गुजराण करणारी आहेत. येथील पुरुष मंडळी अर्थात घरातील कर्तीमंडळी सकाळी कामानिमित्त घरातून लवकर निघून जातात. तर घरातील महिला घरकाम करत बहुदा बिडी वळण्याचे काम दिवसभर करत असतात. त्यामुळे त्यांकडून आपल्या मुलांकडे लक्ष देणे, ती काय करत आहेत याचा अंदाज घेणे अशा महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष होते. आपला पाल्य शाळेत शिकतो का? तो काय शिकतोय? शाळेत नियमित जातो का? तो सध्या कोणासोबत असतो? शाळेमध्ये काय करतो? शाळेतल्या प्रत्येक गोष्टींमध्ये सहभागी होतो का? त्याचा शाळेतला अभ्यास कसा आहे? आदी गोष्टींकडे पाहण्यासाठी पालकांकडे पुरेसा वेळ नाही.

एकंदर पालकांच्या बोलण्यावरून असे दिसून आले की, पाल्याची जबाबदारी ही आपल्यापेक्षा ही शाळेचीच जास्त आहे. परिणामी मुलांच्या वागण्यात, बोलण्याकडे, त्यांच्या एकंदर वर्तणूकीकडे, त्या संदर्भातल्या विकासाकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. मुले विविध गोष्टींकडे आकर्षित होतात. प्रत्येकाच्या मनात कोणता ना कोणता तरी स्वतःचा नायक, नेता, हिरो, आयकॉन असतो. त्याला आपला आदर्श मानून प्रत्येकजण त्याच्यासारखे वागणे, चालणे, बोलणे, आपल्या प्रत्येक गोष्टी त्याच्यासारख्या करणे, कॉपी करणे, त्याला फॉलो करायला आवडते. त्याच्या त्याच्यासारखे होण्यासाठी तो सतत धडपडत असतो. पण अशावेळेस चांगल्या-वाईटाचा, प्रत्यक्ष परिस्थितीचा, त्यांच्या संघर्षाचा विचार न करता आयकॉन्सचे अनुकरण (अंधानुकरण) करताना दिसतात. त्याचे होणारे दुष्परिणाम महाभयंकर आहेत.

शाळेमध्येच अशी एक व्यवस्था निर्माण करावी ज्याद्वारे उद्याचे आयकॉन चांगल्या पद्धतीने या मुलांमधून लहानपणी घडावेत. यासाठी एखादा क्लब स्थापन करावा. यातून शाळेतील इतर सर्व मुलांना प्रेरणा मिळावी अशी कल्पना सुचली. मग याला समर्पक असे **‘आयकॉनिक क्लब’** नाव देऊन हा क्लब स्थापन केला. याद्वारे विविध मुलांचे आयुष्य घडवण्याचा प्रयत्न केला. शिवाय इतर मुलांच्यासमोर त्यांना त्यांचे आदर्श कसे असावेत? याचा नियोजनबद्ध वस्तुपाठ या माध्यमातून देता येऊ शकतो.

समाजातील अनेक आयकॉन्स आपण बघतो, परंतु त्यांच्याशी प्रत्यक्षात आपला संपर्क होणे कठीण असते. जर शाळेमध्येच अशा विविध क्षेत्रातील आवड असलेली मुले आयकॉन म्हणून शाळेतील सर्व मुलांसमोर उभे राहिल्यास निश्चितच

मुलांना त्यांचा एक नवीन आयकॉन मिळू शकेल. सर्वंकष गुणवत्ता वाढण्याबरोबरच शिक्षणात रंजकता वाढून विद्यार्थ्यांना शाळा, शाळेतील मित्र आपलेसे वाटतील. **आयकॉनिक क्लब**च्या माध्यमातून शालेय जीवनापासून संधी दिल्यास भविष्यात विविध क्षेत्रात नेतृत्व करण्यास सक्षम होतील. हा गरज पूर्ण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अतिशय महत्वाचा आहे.

## ३. उपक्रमाची उद्दिष्टे

- शाळेतील विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांसमोर **'प्रेरक व्यक्तिमत्व'** म्हणून ओळख मिळवून देणे.
- मुलांमधील असलेले सुप्तगुणांना हेरून त्याला योग्य वळण लावणे.
- कुतूहल, जिज्ञासा, चौकसबुद्धी, वैज्ञानिक दृष्टिकोन, कळीचे प्रश्न उपस्थित करता येण्याची क्षमता निर्माण होण्यास संधी उपलब्ध करणे.
- स्वतंत्र विचार व स्वतंत्र अभिव्यक्ती क्षमता, कलात्मक आविष्कार क्षमता, खिलाडूवृत्तीने अपयश पचविण्याची हिंमत, धाडसीवृत्ती, जोखीम स्वीकारण्याची तयारी इ. गुणांचा विकास व्हावा असे शैक्षणिक वातावरण विकसित करणे.
- विद्यार्थ्यांच्या समोर चांगले नेतृत्व, संघनायक, आयकॉन्स निर्माण करणे.

# ४. नवोपक्रमाचे नियोजन

आयकॉनिक क्लब स्थापन होण्यापूर्वी शाळांमध्ये पोषक वातावरण होणे तितकेच गरजेचे होते. कारण शाळेत विद्यार्थ्यांनी नियमित येण्याची गोडी लागण्याबरोबरच त्यासाठी शाळेचे वातावरण पोषक कसे राहील हेसुद्धा पाहणे गरजेचे होते. यासाठी मुख्याध्यापक मल्लिनाथ स्वामी, संस्थेचे सन्मानीय पदाधिकारी तसेच माझ्या शिक्षक मित्रांशी चर्चा केली. त्यानंतर माझ्या विविध क्षेत्रातील परिचयाचे, प्रतिष्ठित व्यक्ती ज्यात अभिनेते अमीर तडवळकर, दैनिक सकाळचे संपादक अभय दिवाणजी, डायट सोलापूर विज्ञान विषय सहायक बाळासाहेब वाघ, अक्षरमित्र अमित भोरकडे, पक्षीतज्ज्ञ तथा विहंग मंडळाचे अध्यक्ष डॉ. निनाद शहा, एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे, प्रिसिजन फाऊंडेशनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांच्याशी चर्चा केली.

सुरुवातीला मुलांना आवडीनिवडी काय आहेत?, त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रामधील कोण आवडते? कोण बनायला आवडेल? अशा हलक्याफुलक्या प्रश्नांनी त्यांच्या आवडी निवडी समजून घेतल्या. त्यांच्या मनात असलेले त्यांचे नायक, आयकॉन्स कोणते आहेत? याची विचारणा केली. त्यानंतर इयत्ता चौथी ते सातवी प्रत्येक वर्गातील वर्गशिक्षकांना त्यांच्या वर्गातील वरील केलेल्या पाच क्षेत्रांनुसार काही मुलांची नावे सुचविण्यास सांगितले आणि या सर्व विद्यार्थ्यांना एकेदिवशी एकत्र बसून त्यांच्यातील कलागुणांना समजून घेण्याचा, त्यांना कशा पद्धतीने वाव देता येईल, इतर विद्यार्थ्यांच्या समोर त्यांना सादर करता येईल या संदर्भातली चर्चा झाली व यातून एकूण २५ विद्यार्थ्यांचा आयकॉनिक क्लब नव्याने तयार करण्यात आला. वास्तविक पाहता हा क्लब हा १९ फेब्रुवारी २०१७ रोजीच स्थापन झाला. यात एकूण ५ विभागांमध्ये

यावर्षी नव्याने विभागला गेला. प्रत्येक विद्यार्थ्यांना यात किमान एक आणि जास्तीत जास्त दोन विभागामध्ये सहभागी केले. प्रत्येक क्षेत्रात जास्तीत जास्त ५ असे विद्यार्थी ठेवण्यात आले. प्रत्येकाला त्यांच्या आवडीनुसार विभाग निवडण्याची संधी देण्यात आली. एका विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त दोन विभागांमध्ये सहभागी होण्याचं आवाहन करण्यात आले. ज्यामुळे प्रत्येक मुलाला त्याचे आवडते क्षेत्र आणि त्या क्षेत्रामध्ये काम करण्याची संधीचा आनंद मिळू शकणार होता आणि त्यामुळे मुले उत्स्फूर्तपणे आपल्या आवडीच्या क्षेत्रांत सहभागी होऊ लागली. शाळेतील मुलांच्या समोर कोणत्या प्रकारचे आयकॉन्स असावेत याचा विचार समोर आला तेव्हा हा क्लब स्थापन करण्याची कल्पना समोर आली. त्यातील मुख्य अशा ५ क्षेत्रांना समोर ठेवून त्यांची यादी निश्चित केली आहे.

- ✓ **वक्तृत्व क्षेत्र**
- ✓ **विज्ञान- तंत्रज्ञान क्षेत्र**
- ✓ **लेखन क्षेत्र**
- ✓ **कला व सृजनशील विचार क्षेत्र**
- ✓ **क्रीडा क्षेत्र**

**आयकॉनिक क्लब** या पूर्वी जरी स्थापन केला असला, तरी त्यात काळानुरूप बदल व्हावेत हा कायम विचार नियोजनात करण्यात आला. त्यामुळे यावर्षी त्याचं आयोजन व अंमलबजावणी करताना त्यात काही बदल, सुधारणा (रिफॉर्म) केले. हे जरी असले तरी यापुढेही विचारपूर्वक परिवर्तन (ट्रान्सफॉर्म) घडत राहणार हे मात्र नक्की!

| अ. क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | संबंधित व्यक्ती आणि तज्ञ यांच्याशी चर्चा | जून तिसरा आठवडा |
| २ | शाळेतील विद्यार्थ्यांशी, पालकांशी चर्चा | जून चौथा आठवडा |
| ३ | आयकॉनिक क्लब विद्यार्थी निवड प्रक्रिया | जुलै पहिला आठवडा |
| ४ | निवडलेल्या विद्यार्थ्यांना क्लबच्या कार्यपद्धतीबद्दल मार्गदर्शन | जुलै दुसरा आठवडा |
| ५ | विविध क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाला सुरुवात | २५ जुलै २०२२ |
| ६ | क्षेत्रानुसार विविध उपक्रमांचे आयोजन व मार्गदर्शन | १ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२२ |
| ७ | क्लबच्या सदस्यांच्या माध्यमातून अन्य विद्यार्थ्यांना मार्गदर्शन | सप्टेंबर २०२२ शेवटचा आठवडा |
| ८ | आवश्यकतेनुसार क्षेत्रभेटीचे आयोजन | वर्षभर (आवश्यकतेनुसार) |
| ९ | क्षेत्रानुसार विविध स्पर्धांसाठी मुलांची नामनिर्देशन, सहभाग, मार्गदर्शन | १५ जून ते ३० एप्रिल २०२३ दरम्यान |
| १० | क्लबच्या एकंदर कार्याचे मूल्यमापन | एप्रिल २०२३ शेवटचा आठवडा |
| ११ | सदस्यांचे गेट-टुगेदर व तज्ज्ञांचे मार्गदर्शन शिबिर | मे २०२३ पहिला आठवडा |
| १२ | बक्षीस वितरण व आगामी वर्षाचे नियोजन - चर्चा | ६ मे २०२३ |

# साधनांची निर्मिती

उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सर्वात महत्वाचे साधन म्हणून सर्व सोयींनीयुक्त अशी वर्गखोली आवश्यक होती. या क्लबच्या सर्व २५ सदस्यांना एकत्र करण्यासाठी, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शाळेची ई-लर्निंगची खोली निवडण्यात आली. जेथे इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, आय.आर. कॅमेरा, साऊंड सिस्टिम, सोलर सिस्टिम इ. बाबींचा समावेश आहे. या क्लबसंदर्भात मुलांच्या मनात वेगळे वातावरण बनण्यासाठी क्लबचा लोगो, लोगोचे ॲनिमेशन, पोस्टर डिझाईन करण्यात आले. आठवड्याच्या दर शनिवारी (आवश्यकतेनुसार नियोजनात लवचिकता ठेवली) क्लबच्या सदस्यांची मीटिंग घेतली जाते. विद्यार्थ्यांच्या निवडलेल्या क्षेत्रासाठी आवश्यक साहित्य आहे. अनेकवेळा विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रभेटी आयोजन करण्यासाठी आवश्यक असलेले साहित्य, प्रवासाची व्यवस्था करण्यासाठी शाळेतील शिक्षक, शाळा, पालक तसेच समाजातील दानशूर व्यक्तींची मदत घेतली.

आता तर या उपक्रमाला **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन ही १ लाख रु. ची पाठ्यवृत्ती** प्राप्त झाल्याने चांगली गती मिळाली आहे. अनेक प्रसिद्ध कलाकारांसोबत भेट, त्यांचे मानधन देण्यासाठी, मुलांच्या विविध स्पर्धा, उपक्रम, बैठक व्यवस्था, सर्व उपक्रम राबविताना येणारा खर्च, मुलांना प्रेरणा देणारे व्हिडीओ, ऑडीओ, पुस्तकांची उपलब्धता, सर्व क्षेत्रातील आयकॉन्सचे फोटो इ. चा विचार साधन म्हणून करावा लागतो. हा शैक्षणिक परिवर्तन उपक्रम मागील काही महिने कोरोनामुळे शाळा बंद असल्याने जास्त चांगल्याप्रकारे राबविण्यात, साधनाची उपलब्धता होण्यास काही अडचणी निर्माण झाल्या, पण २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात जास्त जोमाने, उत्साहाने आवश्यक तेथे बदल स्वीकारत राबवला आहे.

# आवश्यक घटकांची मदत

कोणताही उपक्रम कोण्या एका व्यक्तीमुळे पूर्णपणे यशस्वी होऊ शकत नाही. त्यासाठी असंख्य लोकांची साथ तितकीच महत्त्वाची असते. उपक्रम यशस्वी होण्यासाठी अनेक आवश्यक घटक आहेत. त्यामध्ये शाळेचे मुख्याध्यापक मल्लिनाथ स्वामी, संस्थेचे अध्यक्ष रवींद्रकुमार शिखरे, सचिव अरुण शिखरे व आयकॉनिक क्लबमधील विद्यार्थी ज्या वर्गातील आहेत त्या वर्गाचे वर्गशिक्षक यांची देखील हा उपक्रम राबवताना खूप मदत झाली आहे. त्यांचे सहकार्य असल्यामुळे अपेक्षित यश संपादन करता आले.

त्याचबरोबर या उपक्रमाला आवश्यक असणारे आर्थिक पाठबळ **यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई** तर्फे **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन**च्या माध्यमातून मिळाले. प्रिसिजन फाउंडेशन व बैठक फाउंडेशन, पुणे यांच्या माध्यमातून **बैठक @ स्कूल** या उपक्रमासाठी अनेक कलाकार विनामूल्य उपलब्ध होण्यासाठी मदत झाली आहे. भविष्यातील गरजा ओळखून मुलांनी संगणक साक्षर होणे गरजेचे आहे. आणि ही गरज ओळखून स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड या कंपनीने रुपये २,००,००० इतक्या किमतीच्या १० संगणकांचा संच विविध साधनांसह उपलब्ध केला. हे **आयकॉनिक क्लब**चे यश म्हणता येईल.

# ५. नवोपक्रमाची कार्यपद्धती

'आयकॉनिक क्लब'च्या माध्यमातून माहेवार अनेक उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमांना (क्षेत्रनिहाय) विषयानुसार मांडणे संयुक्तिक होईल.

## वक्तृत्व क्षेत्र

विविध स्पर्धांच्या माध्यमातून व अनेक मान्यवरांची भाषणे मुलांच्या ऐकवून त्यांच्या वक्तृत्व कौशल्य विकसनासाठी प्रयत्न केले जात आहेत.



विविध स्पर्धांच्या माध्यमातून किंवा मान्यवरांची भाषणे मुलांना प्रत्यक्ष ऐकवून त्यांच्या वक्तृत्व कौशल्य विकसनासाठी प्रयत्न केले. ६ डिसेंबर रोजी **डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन** असल्याने औचित्य साधून **ज्येष्ठ साहित्यिक डॉ. एम.डी. शिंदे** यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.














**महापरिनिर्वाण दिनाचे** औचित्य साधून विद्यार्थ्यांनीही आपले वक्तृत्व कौशल्य दाखविले.

दि. ३० जानेवारी २०२३ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त **आयकॉनिक क्लब**च्या माध्यमातून शाळेत राजकिरण चव्हाण यांचे **महात्मा गांधी समजून घेताना...!** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महात्मा गांधी यांचे विचार बालपणापासून रुजावेत, गांधीजींनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाबद्दल जनमानसात असलेले समज व गैरसमज दूर व्हावेत यासाठी तंत्रस्नेही शिक्षक राजकिरण चव्हाण यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. महात्मा गांधी यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना व त्यावेळी त्यांनी घेतलेली भूमिका यावर सविस्तर माहिती सदरील व्याख्यानातून विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी  उदाहरण दाखल्यांच्या साह्याने आपले विचार एखाद्या विषयावर मुद्देसूदपणे कसे मांडावेत याचा वस्तुपाठ देण्याचा प्रयत्न केला.



राजकिरण चव्हाण हे **महात्मा गांधी समजून घेताना...!** या विषयावर व्याख्यान देताना

## विज्ञान- तंत्रज्ञान क्षेत्र

निश्चित केलेल्या पाच क्षेत्रांपैकी **विज्ञान आणि तंत्रज्ञान** व **कला व सृजनशील विचार** या क्षेत्राच्या संदर्भात या महिन्यात नियोजन करण्यात आले. त्यानुसार शाळेतील विज्ञानाची आवड असलेल्या मुलांचा ग्रुप करून भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात **इसरो** कडून आयोजित '***ओव्हर व्ह्यू ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी फॉर स्कूल स्टुडंट'*** या एक महिन्याच्या ऑनलाईन कोर्ससाठी मुलांना बसवण्यात आले. तत्पूर्वी या कोर्स संदर्भात २० जून २०२२ रोजी पालकांची मिटिंग घेऊन सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी तब्बल **अठरा** (१८) विद्यार्थ्यांना कोर्स यशस्वीपणे पूर्ण केला. याबद्दल इसरोकडून **ऑनलाईन प्रमाणपत्र** देखील प्राप्त झाले.









इसरो isro

अंतरिक्ष विभाग /DEPARTMENT OF SPACE
भारत सरकार/GOVERNMENT OF INDIA
भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संगठन/INDIAN SPACE RESEARCH ORGANISATION
भारतीय सुदूर संवेदन संस्थान, देहरादून / INDIAN INSTITUTE OF REMOTE SENSING, DEHRADUN

नामांकन सं. / Enrolment No.: IIRS20227221731

# COURSE PARTICIPATION CERTIFICATE OF

## ONLINE COURSE

THIS CERTIFICATE IS
AWARDED TO

ALSABA LIYAKAT SHAIKH

(DATE OF BIRTH- 27-11-2010, CLASS- VII OF SCHOOL- SHRI SAMARTH VIDYAMANDIR, SOLAPUR)

ON PARTICIPATION IN

OVERVIEW OF SPACE SCIENCE & TECHNOLOGY- FOR SCHOOL STUDENTS

THIS ONLINE COURSE WAS CONDUCTED
BY

INDIAN INSTITUTE OF REMOTE SENSING, ISRO DEHRADUN

DURING 06-06-2022 TO 05-07-2022 (TOTAL COURSE DURATION WAS 12 HOURS)

Date: JULY 15, 2022
Place: Dehradun, India

निदेशक/ Director
आई०आई०आर०एस, देहरादून/ IIRS, Dehradun

***'ओव्हर व्ह्यू ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी फॉर स्कूल स्टुडंट'*** *हा कोर्स यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या १८ विद्यार्थ्यांना इसरोकडून या पद्धतीचे* ***ऑनलाईन प्रमाणपत्र*** *प्राप्त झाले.*

# 'इसरो'तर्फे विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राचे धडे

## प्रमाणपत्रांचे वितरण; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्रीय संकल्पना व त्यातील तंत्रज्ञान याची माहिती विद्यार्थीदशेपासूनच समजावी, यासाठी इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन अर्थात इसरोकडून एक महिन्याच्या 'ओव्हरव्ह्यू ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी फॉर स्कूल स्टुडंट्स' या ऑनलाईन कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राचे धडे देण्यात आले.

या कोर्ससाठी श्री समर्थ विद्यामंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. हा अभ्यासक्रम यशस्वी पूर्ण केलेल्या शाळेतील अठरा विद्यार्थ्यांना इसरोकडून ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात आले. शाळेमध्ये या प्रमाणपत्राचे विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले. संस्थेचे सचिव श्री अरुण शिखरे यांच्या शुभहस्ते या प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यापक मल्लिनाथ स्वामी उपस्थित होते.

या कोर्ससाठी शाळेतील तंत्रस्नेही शिक्षक राजकिरण चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. श्रुती शिखरे, दिपाली शहाणे व दैवशाला उकिरडे यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी पालकांमधून तानाजी पांचाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकिरण चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन श्रुती शिखरे यांनी केले. कार्यक्रमासाठी शिक्षक महादेव चौरे, मंजुषा मुळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



सोलापूर : 'इसरो'कडून ऑनलाईन प्रमाणपत्र मिळालेले विद्यार्थी.

## व्याख्यानाचे आयोजन


दि. १४ डिसेंबर २०२२ रोजी **'संवाद...विद्यार्थ्यांशी!'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात **जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. अण्णासाहेब मोहोळकर** यांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मल्लिनाथ स्वामी तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव अरुण शिखरे सर यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. मोहोळकर यांनी **आत्मनिर्भर भारतासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाचे धडे, प्रतिज्ञा, संविधानाची आवश्यकता, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कशी प्रगती साधता येते** आदी गोष्टींचे व्याख्यानातून माध्यमातून मार्गदर्शन केले. त्याबरोबर मुलांकडून विविध बाबींवर अपेक्षा व्यक्त केल्या. या कार्यक्रमानंतर शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांशी त्यांनी मुक्त संवाद साधला.








सर सी.व्ही. रमन यांच्या कार्याप्रीत्यर्थ राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या औचित्याने साधून विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून **ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. व्यंकटेश गंभीर** यांनी बालपणापासूनच संशोधनवृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. प्रा. गंभीर यांनी बालपणापासूनच विद्यार्थ्यांनी छोट्या छोट्या गोष्टींमध्ये प्रयोग करत राहून आपली जिज्ञासूवृत्ती, संशोधनवृत्ती जोपासावी असे आवाहन करताना शाळेतील इन्स्पायर अवॉर्ड विजेत्या सिमरन मोमीन, सुशीला गुमळे व कार्तिक वडलाकोंडा या विद्यार्थ्यांचे देखील गुलाबपुष्प देऊन कौतुक केले. शाळेतील ४५ पेक्षा जास्त विज्ञान प्रयोगाचे सादरीकरण देखील पाहिले. भारताने जगाचे नेतृत्व करावे व विश्वगुरु बनावे यासाठी भारत सरकार इनोव्हेशन अर्थात नवकल्पनेवर लक्ष केंद्रित आहे करत आहे. शाळेत **आयकॉनिक क्लब** अंतर्गत **आविष्कार कार्यशाळा** घेण्यात आली. त्या कार्यशाळेतूनच मुलांना या स्पर्धेसाठी मार्गदर्शन करण्यात आले.



# लेखन क्षेत्र

**आयकॉनिक क्लब**च्या माध्यमातून लेखन क्षेत्रांतर्गत **'फलक लेखन कार्यशाळा'** या उपक्रमाचे आयोजन दि.१५ डिसेंबर २०२२ रोजी करण्यात आले. राजकिरण चव्हाण यांनी मार्गदर्शन करताना मार्कर पेनच्या साह्याने कागदावर किंवा वहीवर कसे लिहावे तसेच फलकावर खडूच्या साह्याने लेखन कसे करावे यासंबंधी काही युक्त्या सांगितल्या. या कार्यशाळेत ८० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांनी सहभाग नोंदवला.




















## मराठी भाषा गौरव दिन भित्तिपत्रक व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन

कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन दैनिक लोकमत मुख्य उपसंपादक विलास जळकोटकर यांनी केले. दैनिक लोकमतचे मुख्य उपसंपादक विलास जळकोटकर यांच्या हस्ते **मराठी भाषेचा प्रवास व मराठीला समृद्ध करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची माहिती असलेली भित्तिपत्रक व पोस्टर प्रदर्शनाची फीत कापून केली.** यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भित्तिपत्रकाच्या माध्यमातून मराठी भाषेसंबंधी विविध बाबींवर प्रकाश टाकला. **आयकॉनिक क्लब**च्या विद्यार्थांना लेखनाविषयीचे विलास जळकोटकर यांनी मार्गदर्शन केले.





# कला व सृजनशील विचार क्षेत्र

## आविष्कार : शोध... नवकल्पना असणाऱ्या बालसर्जकांचा!

ही कार्यशाळा दि. १३.०९.२०२२ रोजी श्री समर्थ विद्यामंदिर, सोलापूर येथे घेण्यात आली. जगातील अनेक समस्यांवरती विविध कल्पनांच्या माध्यमातून लोकांनी अर्थात संशोधकांनी उत्तरे शोधली आहेत. असेच अचाट व कल्पक विचार मुलांच्या मनात देखील येत असतात. गरज असते फक्त वातावरण निर्मिती करून संधी उपलब्ध करून देण्याची. आणि ती संधी आजच्या आविष्कार कार्यशाळेच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली. या कार्यशाळेसाठी **राजकिरण चव्हाण** मार्गदर्शन यांनी केले







मेहंदी कला
संवर्धनासाठी
स्पर्धा व
मार्गदर्शनाचे
आयोजन




वैज्ञानिक व
सर्जनशील
विचारासाठी
व्याख्यानाचे
आयोजन
(गणेशोत्सवानिमित्त)

## कथक नृत्य प्रस्तुती :

त्याचबरोबर **कला व सृजनशील विचारक्षेत्र** या माध्यमातून भारतातील ज्या **अभिजात कला** आहेत त्यातील **कथक नृत्य** हा प्रकार जनसामान्यांमध्ये रुजला जावा, त्याची बालपणातच आवड निर्माण व्हावी आणि भविष्यातील या क्षेत्रातला एखादा आयकॉन समोर यावा या दृष्टिकोनातून प्रिसिजन फाउंडेशन व बैठक फाउंडेशन, पुणे च्या मदतीतून ***'बैठक@स्कूल'*** या उपक्रमाच्या माध्यमातून मी माझ्या शाळेमध्ये दि. २५ जुलै २०२२ रोजी सुप्रसिद्ध कथक नृत्यांगना **पूजा भट्टड** यांना आमंत्रित करून मुलांना त्या संदर्भातील प्रशिक्षण देण्याचा प्रारंभिक प्रयत्न केला.



## हार्मोनियम वादन :






**युट्युब लिंक :** https://youtu.be/1qv4kl3SMN4

## धृपद गायन :

प्रिसिजन फाउंडेशन व बैठक फाउंडेशन पुणे ***बैठक@स्कूल*** या उपक्रमांतर्गत **चिंतन उपाध्याय** यांचं **'धृपद गायन'** २३ सप्टेंबर २०२२ रोजी शाळेत आयोजित करण्यात आले होते व तितकीच त्यांच्या गायनाला पखवाज च्या माध्यमातून साथ दिली ती म्हणजे प्रताप आव्हाड यांनी. संपूर्ण एक तासाच्या




या मैफिलीमध्ये मुलं मंत्रमुग्ध होऊन गेली होती. किंबहुना गायकांच्या सोबतीनं त्यांनी

देखील आपला रियाज करून घेतला. चिंतन उपाध्याय यांच्याकडूनही या मुलांचे मुक्तकंठाने कौतुक करण्यात आलं. नक्कीच अशा **अभिजात कला** शालेयस्तरावरती रुजवणं, त्यांचं सातत्यानं संवर्धन होणं ही काळाची गरज आहे. जेणेकरून उद्याचा **'उत्तम गायक'** आजच्या वर्गातील मुलांमधून घडू शकेल.

## भरतनाट्यम प्रस्तुती :




भारतीय अभिजात कला यांचं संरक्षण आणि संवर्धन होण्यासाठी शालेय स्तरावर ***'बैठक ॲट स्कूल'*** हा उपक्रम अनुभव उपक्रम गेल्या दोन वर्षांपासून राबवला जात आहे. त्याचाच पुढील टप्पा म्हणून भरतनाट्यम नृत्यांगना **ईशा पिंगळे** यांच्या **भरतनाट्यम प्रस्तुती**चे शाळेत आयोजन करण्यात आले. यावेळी यांचा विविध भावमुद्रा, ऋतूमुळे निसर्गात होणारा बदल हे देखील आपल्या नृत्य सादरीकरणातून विद्यार्थ्यांना दाखवले. ***"राधा रुसली, माधव रुसला, रुसले गोकुळ"*** हे सादरीकरण केले. शेवटी ***"ठुकम चलत रामचंद्र, बाजे पैंजनिया"*** या संत तुलसीदास यांच्या भजनातील आई व बाळ यांच्यातील 'वात्सल्य' नृत्याविष्कारातून दाखवून देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. **आयकॉनिक क्लब** मधील विद्यार्थ्यांचा यामध्ये प्रामुख्याने सहभाग घेण्यात आला. यातून सुरुवातीला विद्यार्थ्यांनी या कलेचे **'रसग्रहण'** कसे करावे? हे सांगण्याचा प्रयत्न आम्ही केला.

## मुलांच्या कलागुणांना योग्य संधी मिळाली तर ती मुले चमकतातच.

**सोलापूर टॅलेंट हंट फॅशन शो :२०२२** मध्ये **कबीर सय्यद** याने **मॉडेल** म्हणून पहिले पारितोषिक जिंकले..









‘आयकॉनिक क्लब’ अंतर्गत **वारली पेंटिंग** कार्यशाळेचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यशाळेला शरद पवार इन्स्पायर फेलोशिपचे विजेते उपक्रमशील शिक्षक राजकिरण चव्हाण यांनी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. विविध क्षेत्राचे भविष्यात नेतृत्व करू शकतील असे विद्यार्थी शालेयस्तरापासूनच घडवणे या अनुषंगाने क्लबच्या कला क्षेत्राच्या अंतर्गत हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. या कार्यशाळेला शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेच्या सुरुवातीला राजकिरण चव्हाण यांनी वारली जमात, त्यांचे जीवन, त्यांची चित्रकला या संदर्भात थोडक्यात माहिती सांगितली. शालेयस्तरावरून या कलेसंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जागृती होऊन काही कलाप्रेमी विद्यार्थी समोर यावेत यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले.





**वारली पेंटिंग उपक्रमाचा कोलाज**



**वारली पेंटिंग दाखवताना विद्यार्थी**

शाळेत घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांमुळे समाजात एक **‘उपक्रमशील शाळा’** म्हणून श्री समर्थ विद्यामंदिरची ओळख निर्माण झाली आहे. भविष्यातील गरजा ओळखून मुलांनी कॉम्प्युटर साक्षर होणे गरजेचे आहे. आणि ही गरज ओळखून स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड या कंपनीने रुपये २,००,००० इतक्या किमतीच्या १० संगणकांचा संच विविध साधनांसह उपलब्ध केला. हे **आयकॉनिक क्लब**चे यश म्हणता येईल. या माध्यमातून लवकरच **‘डॉ. विजय भटकर कॉम्प्युटर लिटरसी प्रोग्राम’** शाळेत सुरू केला व पुढील वर्षापासून दोन्ही सत्रांमध्ये नियमितपणे संगणक साक्षरतेसाठी **आयकॉनिक क्लब** व त्याचे सदस्य प्रयत्न करतील.





## क्रीडा क्षेत्र

**लाठीकाठी** हा शिवकालीन कला व क्रीडा प्रकार आहे. श्री समर्थ विद्यामंदिर या शाळेतील 'आयकॉनिक क्लब'च्या माध्यमातून अन्य विद्यार्थ्यांसाठी हा क्रीडा प्रकार घेतला जाणार आहे. यातील उत्तम असे ३० खेळाडू विविध स्तरावरील स्पर्धांसाठी निवडले जातील. त्यासाठी या उपक्रमास 'Super30 TathiKathi' नाव देण्यात आले.










भारतीय त्यातल्या त्यात आपल्या महाराष्ट्राच्या मातीचा व शिवरायांची परंपरा लाभलेला खेळ जपणे, त्याचा प्रसार व प्रचार करणे आवश्यक आहे. शिवाय स्वसंरक्षणासाठी ही कला शिकणे आवश्यक आहे. प्रसिद्ध लाठीकाठी प्रशिक्षक अश्विन कडलासकर यांचे यासाठी मार्गदर्शन असणार आहे.

## अर्जुन पुरस्कार विजेत्या खेळाडूस भेटण्याची संधी

क्रीडा क्षेत्रातील एक आयकॉन अर्जुन पुरस्कार विजेत्या, आंतरराष्ट्रीय खेळाडू **शीतल खरटमल** यांना २६ जानेवारी, प्रजासत्ताकदिनी **ध्वजारोहण** करण्यास आमंत्रित करून मुलांना खेळासंदर्भात प्रेरित करण्याचा प्रयत्न केला. शाळेतील मुलांसाठी मार्शल आर्टचे आपण मार्गदर्शन करणार असल्याचे **शीतल खरटमल** यांनी आश्वासन दिले.








## उपक्रमोत्तर कृती :

उपक्रम झाल्यानंतर त्याचा संपूर्ण आढावा घेतला गेला. क्लबमधल्या मुलांनी त्यांच्या निवडलेल्या/ निवडून दिलेल्या क्षेत्रात कोणकोणत्या गोष्टीमध्ये सहभाग घेतला?, कोणते उपक्रम हाती घेतले?, त्याकरिता कोणते प्रयत्न केले? याच्या नोंदी तपासल्या गेल्या. मुलांची वर्षभरातील प्रगती पडताळली गेली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी निवडलेल्या क्षेत्रामध्ये आणखी कुठे, कसा वाव देता येऊ शकतो यासाठी तज्ज्ञांच्या मदत घेतली जागेली. शेवटच्या वर्गात (इ. ७ वी मध्ये) असणारे विद्यार्थी शाळा सोडून गेल्यानंतरही त्यांना सतत मार्गदर्शन उपलब्ध व्हावे यासाठी **'आयकॉनिक क्लब हेल्पलाईन'** कायमस्वरूपी कार्यरत असेल. यातून त्यांच्या प्रगतीचा आढावा घेणे शक्य होईल. हा विचार समोर आला. लवकरच यावर काम सुरु होईल.

या क्लबच्या विद्यार्थ्यांनी वर्षभरात साध्य केलेली प्रगती शाळेतील अन्य विद्यार्थ्यांसाठी कशी उपयोगी ठरेल यासाठी विविध उपक्रम यापुढेही हाती घेतले जातील. या उपक्रमांच्या माध्यमातून या मुलांना अन्य मुलांचे नेतृत्व करता यावे यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. ज्याचा शाळेतील मुलांची सर्वंकष गुणवत्ता वाढण्यासाठी उपयोग करता येईल.

# आलेल्या अडचणी व अनुभव

आयकॉनिक क्लब या उपक्रमाचा गेल्या काही वर्षांचा सोबतीला असलेला अनुभव यामुळे तशा जास्त अडचणी आल्या नाहीत, पण क्रीडा क्षेत्रासंदर्भात जास्त उपक्रम शाळेतील जागेअभावी व अन्य काही तांत्रिक कारणांमुळे घेणे शक्य झाले नाही.

याशिवाय वेळापत्रकानुसार प्रत्येक गोष्ट वेळेवरच होईल असे होत नाही. अनेकवेळा उपक्रम आयोजनाच्या वेळेत बदल करण्यात आले. या उपक्रमासाठी तज्ज्ञ व्यक्तींची नियोजित वेळी उपस्थिती लाभेल असे नाही. असे काही अपवाद वगळता जास्त अडचणी आल्या नाही. असे आपण नेहमीच ऐकतो की, अडचणी व संकटामुळे माणसाला भरपूर काही शिकायला मिळते. या उपक्रमाच्या माध्यमातून नियोजनामध्ये लवचिकता कशी ठेवावी? हे समजले. त्याचबरोबर या उपक्रमातून अनेक दिग्गज लोकांशी जवळून संबंध आला. त्यांच्या अनुभवातून भरपूर काही शिकता आले. नक्कीच आयकॉनिक क्लब या उपक्रमातून विद्यार्थ्यांबरोबर मी स्वतःही अधिक समृद्ध होत असल्याचा अनुभव मला मिळाला.


# ‘आयकॉनिक क्लब’ बक्षीस वितरण

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात आयकॉनिक क्लबच्या माध्यमातून राबवले गेलेल्या विविध उपक्रमात सातत्याने यश मिळवनाऱ्या विद्यार्थ्यांना एका विशेष कार्यक्रमांमध्ये सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले.




| अ.क्र. | पदक मिळवणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव | पदकाचा प्रकार |
|---|---|---|
| १ | सिमरन आरिफ मोमीन | सुवर्ण पदक |
| २ | अब्दुल हाफिज वसीम नायकवाडी | सुवर्ण पदक |
| ३ | सुशीला इमानुवेल गुमळे | सुवर्ण पदक |
| ४ | आसिया गुलअहमद शेख | सुवर्ण पदक |
| ५ | अनय विराज माजगावकर | सुवर्ण पदक |
| ६ | इकरा महेबूब शेख | सुवर्ण पदक |
| ७ | आदिती तानाजी पांचाळ | सुवर्ण पदक |
| ८ | कार्तिक विजय वडलाकोंडा | सुवर्ण पदक |
| ९ | मुस्कान नियाज अहमद खान | सुवर्ण पदक |
| १० | अलसबा लियाकत शेख | सुवर्ण पदक |
| ११ | अलकबीर सरफराज सय्यद | सुवर्ण पदक |

# माहितीचे विश्लेषण




**आयकॉनिक क्लबच्या माध्यमातून साधलेली प्रगती (%) मध्ये समजून घेता येईल.**

- वक्तृत्व क्षेत्र : + ३१%
- विज्ञान- तंत्रज्ञान क्षेत्र : + ४२%
- लेखन क्षेत्र : + २८%
- कला व सृजनशील विचार क्षेत्र : + ३०%
- क्रीडा क्षेत्र : +१५%

सर्वाधिक प्रगती : विज्ञान- तंत्रज्ञान क्षेत्र ( + ४२%)

सर्वात कमी प्रगती : क्रीडा क्षेत्र ( +१५%)

**थोडक्यात, सर्व क्षेत्रांच्या प्रगतीची सरासरी २९.२% दिसून येते.**

## ६. नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती (उद्दिष्टानुसार)

- शाळेतील विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांसमोर **'प्रेरक व्यक्तिमत्व'** म्हणून ओळख मिळाली.
- मुलांमधील असलेले सुप्तगुणांना हेरून त्याला योग्य वळण लागले.
- कुतूहल, जिज्ञासा, चौकसबुद्धी, वैज्ञानिक दृष्टिकोन, कळीचे प्रश्न उपस्थित करता येण्याची क्षमता निर्माण होण्यास संधी उपलब्ध झाली.
- स्वतंत्र विचार व स्वतंत्र अभिव्यक्ती क्षमता, कलात्मक आविष्कार क्षमता, खिलाडूवृत्तीने अपयश पचविण्याची हिंमत, धाडसीवृत्ती, जोखीम स्वीकारण्याची तयारी इ. गुणांचा विकास व्हावा असे शैक्षणिक वातावरण विकसित झाले.
- विद्यार्थ्यांच्या समोर चांगले नेतृत्व, संघनायक, आयकॉन्स निर्माण झाले.

# ७. समारोप

येणारा काळ भारताचा आहे. उद्या या जगाचे नेतृत्व भारताकडे असेल. संपूर्ण जग भारताला मोठ्या आशेने पाहत आहे आणि भारत देखील **'विश्वगुरु'** बनण्यासाठी प्रयत्न करत आहे. या जगाचे नेतृत्व करू शकणाऱ्या भारताला अशा नागरिकांची आवश्यकता असेल की, जे विविध क्षेत्रांमध्ये स्वतःचे नेतृत्व सिद्ध करू शकतील. अशावेळी आयकॉनिक क्लबसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून विविध क्षेत्रात उद्याचे नेतृत्व करू शकणारे व्यक्तिमत्व शालेयस्तरापासूनच घडविणे शक्य आहे. मुलांना अशा उपक्रमांच्या माध्यमातून अतिशय नियोजनबद्ध नेतृत्व करण्याची संधी दिली जाते.

या उपक्रमाचा खूप चांगला परीणाम झाला या उपक्रमातून भारत सरकारतर्फे आयोजित प्रतिष्ठित **'इन्स्पायर अवॉर्ड'** साठी सिमरन आरिफ मोमीन, सुशीला इमानुवेल गुमळे, कार्तिक विजय वडलाकोंडा या तीन विद्यार्थ्यांची पुरस्कारासाठी निवड झाली. प्रत्येकी १०,००० रुपये इतकी रक्कम या विजेत्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नवकल्पनेसाठी मिळाली आहे. भारत सरकारच्या इन्स्पायर अवॉर्ड मध्ये माझे तीन विद्यार्थी चमकले. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात **(ISRO) इसरो**कडून **'ओव्हर व्ह्यू ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी फॉर स्कूल स्टुडंट'** हा ऑनलाईन कोर्स यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या १८ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्राप्त झाले. **सोलापूर टॅलेंट हंट फॅशन शो :२०२२** मध्ये **कबीर सय्यद** याने नुकतेच **मॉडेल** म्हणून पहिले पारितोषिक जिंकले. या उपक्रमात **बैठक @ स्कूल** या उपक्रमाचे देखील आयोजन केले जाते. या माध्यमातून कलाक्षेत्रात प्रथितयश यश मिळवलेले कलाकार

शाळेतील मुलांना प्रत्यक्ष येऊन भेटतात; त्यांची कला सादर करतात. अनेक ज्येष्ठ शास्त्रज्ञ शाळेला भेट दिली आहे त्यांच्यापासून मुलांना खूप प्रेरणा मिळाली. आम्ही करत असलेली धडपड पाहून स्मृती ऑरगॅनिक्स या कंपनीने आपल्या सीएसआर फंडातून आमच्या **डॉ. विजय भटकर कॉम्प्युटर लिटरसी प्रोग्राम** या उपक्रमासाठी व शाळेतील सर्व मुलांना संगणक साक्षर बनविण्यासाठी तब्बल **दोन लाख रुपयांची मदत १० कॉम्प्युटरचा संच व आवश्यक फर्निचर साहित्यासह** दिली. ही तर सुरुवात आहे या उपक्रमातून यापुढे देखील अनेक 'हिरे' चमकतील. शिक्षणाबरोबर मुलांच्या नेतृत्वगुणांना विकसित करण्यासाठी हा उपक्रम अतिशय उपयोगी ठरला आहे.

# सार्वत्रिकीकरणासाठी उपयुक्तता

या आधी म्हटल्याप्रमाणे उद्याचे नेतृत्व जर भारत करणार असेल तर भारतातून विविध क्षेत्राचे नेतृत्व तयार झाले पाहिजे. याची सुरुवात जर शालेयस्तरावरून आपण करू शकलो तर नक्कीच हे विद्यार्थी भारताचे भविष्य उज्वल करू शकतील. यासाठी आयकॉनिक क्लबसारखा उपक्रम फक्त एका श्री समर्थ विद्यामंदिर या शाळेपुरता मर्यादित राहून चालणार नाही. या प्रकारचा उपक्रम देशभरातल्या सर्वच शाळांमध्ये सुरु करणे आवश्यक आहे.

हा उपक्रम महाराष्ट्रासह देशातील सर्व शाळांत सुरु करता येऊ शकतो. गुणवत्ता व नेतृत्व घडण्यासाठी शाळांनी व शाळेतील शिक्षकांनी जाणीवपूर्ण प्रयत्न केले, तर ही नक्कीच साध्य होणारी गोष्ट आहे. या आयकॉनिक क्लब उपक्रमाचे सार्वत्रिकीकरण नक्कीच करता येऊ शकते.

# ८. संदर्भसूची व परिशिष्टे

## संदर्भसूची


- **शैक्षणिक नवोपक्रम**
  (लेखक- सिद्धाराम माशाळे, अभिषेक प्रकाशन. २००५)
- **वाटा शैक्षणिक प्रकल्पाच्या**
  (लेखक- सिद्धाराम माशाळे, अभिषेक प्रकाशन. २००५)
- **उपक्रमशीलतेकडून कृतिसंशोधनाकडे**
  (लेखक- सिद्धाराम माशाळे, अभिषेक प्रकाशन. २००५)
- **दिशा नवोपक्रमाची**
  (महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, २०१५)
- **कृतिसंशोधन व नवोपक्रम**
  (डॉ. आहेर मीना, प्रा. सोनवणे संभाजी, प्रा. काटे रामदास, पायल पब्लिकेशन, पुणे)


**शिवाय इंटरनेटच्या माध्यमातून अनेक गोष्टी संदर्भासाठी जाणून घेतल्या आहेत.**

# परिशिष्टे

## प्रत्येक वर्गातून वर्गशिक्षकांच्या मदतीने निवडण्यात आलेले विद्यार्थी

**(आयकॉनिक क्लब स्थापन करण्यापूर्वी)**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|---|
| १ | अलसबा लियाकत शेख | सातवी |
| २ | आसिया गुलअहमद शेख | सातवी |
| ३ | आदिती तानाजी पांचाळ | सातवी |
| ४ | मुस्कान नियाज अहमद खान | सातवी |
| ५ | अनय विराज माजगावकर | सातवी |
| ६ | आनंदी यल्लप्पा शिंदे | सातवी |
| ७ | इकरा महेबूब शेख | सातवी |
| ८ | सुशीला इमानुवेल गुमळे | सातवी |
| ९ | कार्तिक विजय वडलाकोंडा | सातवी |
| १० | अब्दुल हाफिज वसीम नायकवाडी | सातवी |
| ११ | सिमरन आरिफ मोमीन | सातवी |
| १२ | अलकबीर सरफराज सय्यद | सातवी |
| १३ | समृद्धी श्याम कोळी | पाचवी |
| १४ | सोहा सलीमजावेद शिकलगार | पाचवी |
| १५ | रोहिणी तानाजी पांचाळ | सहावी |
| १६ | आर्या रजनीकांत डोलारे | सहावी |
| १७ | आरुष इमानोवेल गुमळे | सहावी |
| १८ | महेक शब्बीर शेख | सहावी |
| १९ | मुबिना अब्दुल जब्बार शेख | सहावी |
| २० | जुनेद वसीम शेख | सहावी |
| २१ | अक्षरा राहुल पांचाळ | सहावी |
| २२ | बिना अनिल घोडके | सहावी |
| २३ | शुभांगी दीपक सोनकांबळे | सहावी |

| | | |
|---|---|---|
| २४ | सुभान वाहिद शेख | पाचवी |
| २५ | दिव्या गोवर्धन उप्पलवार | सहावी |
| २६ | शिफा  अफसर शेख | सहावी |
| २७ | सविता श्रीनिवास कोडम | सहावी |
| २८ | उबेद कासिम मंगलगिरी | सहावी |
| २९ | प्रतीक्षा प्रशांत बिद्रीकर | सातवी |
| ३० | मोहम्मद मलिक गौस शेख | सातवी |

# आयकॉनिक क्लब २०२२-२३

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|---|
| १ | अलसबा लियाकत शेख | सातवी |
| २ | आसिया गुलअहमद शेख | सातवी |
| ३ | आदिती तानाजी पांचाळ | सातवी |
| ४ | मुस्कान नियाज अहमद खान | सातवी |
| ५ | अनय विराज माजगावकर | सातवी |
| ६ | इकरा महेबूब शेख | सातवी |
| ७ | सुशीला इमानुवेल गुमळे | सातवी |
| ८ | कार्तिक विजय वडलाकोंडा | सातवी |
| ९ | अब्दुल हाफिज वसीम नायकवाडी | सातवी |
| १० | सिमरन आरिफ मोमीन | सातवी |
| ११ | अलकबीर सरफराज सय्यद | सातवी |
| १२ | सोहा सलीमजावेद शिकलगार | पाचवी |
| १३ | रोहिणी तानाजी पांचाळ | सहावी |
| १४ | आर्या रजनीकांत डोलारे | सहावी |
| १५ | आरुष इमानोवेल गुमळे | सहावी |
| १६ | मुबिना अब्दुल जब्बार शेख | सहावी |
| १७ | जुनेद वसीम शेख | सहावी |
| १८ | अक्षरा राहुल पांचाळ | सहावी |
| १९ | बिना अनिल घोडके | सहावी |
| २० | शुभांगी दीपक सोनकांबळे | सहावी |
| २१ | सुभान वाहिद शेख | पाचवी |
| २२ | दिव्या गोवर्धन उप्पलवार | सहावी |
| २३ | शिफा  अफसर शेख | सहावी |
| २४ | सविता श्रीनिवास कोडम | सहावी |
| २५ | उबेद कासिम मंगलगिरी | सहावी |

# ‘इसरो’च्या ऑनलाईन स्पर्धेतील यशवंत

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|---|
| १ | सुशीला इमानुवेल गुमळे | सातवी |
| २ | सिमरन आरिफ मोमीन | सातवी |
| ३ | श्रुती इयोब गुमळे | सातवी |
| ४ | शुभांगी दीपक सोनकांबळे | सहावी |
| ५ | रोहिणी तानाजी पांचाळ | सहावी |
| ६ | यासिन मशाक पोशिंदे | सातवी |
| ७ | मो. मलिक गौस शेख | सातवी |
| ८ | मुस्कान नियाज अहमद खान | सातवी |
| ९ | प्रेम सागर चव्हाण | सातवी |
| १० | कार्तिक विजय वडलाकोंडा | सातवी |
| ११ | ओसामा मोहसीन ताडे | सातवी |
| १२ | इकरा महेबूब शेख | सातवी |
| १३ | आसिया गुलअहमद शेख | सातवी |
| १४ | आयान अब्बास सगरी | सातवी |
| १५ | आनंदी यल्लप्पाशिंदे | सातवी |
| १६ | आदिती तानाजी पांचाळ | सातवी |
| १७ | अलसबा लियाकत शेख | सातवी |
| १८ | अनय विराज माजगावकर | सातवी |

**या विद्यार्थ्यांचे**
**सर्व सर्टिफिकेट पाहण्यासाठी**
**हा क्युआर कोड स्कॅन करू शकता**

## इंडोलॉजिस्ट अण्णासाहेब गडदे यांनी केले आयकॉनिक क्लब अंतर्गत घेतलेल्या वारली पेंटिंग उपक्रमाचे कौतुक

**गडदे अण्णासाहेब हरिदास**
इंडोलॉजिस्ट, बीड.
मो. ९८५०९६८९१५

**पत्ता :** रो हाऊस नं. २,
माऊली अपार्टमेंट शेजारी,
स्वराज्य नगर, बीड ४३११२२

दि. २८.१२.२०२२

प्रति,
**मा. राजकिरण चव्हाण,**
**श्री समर्थ विद्यामंदिर, सोलापूर.**

सस्नेह नमस्कार,

निसर्ग आणि मानवी जीवन यांच्यातील दुवा साधणारी कला म्हणजे '**वारली चित्रशैली**'. प्रागैतिहासिक काळापासून ते आजपर्यंत भारतीय कलेतील सर्वात मनमोहक, आकर्षक आणि सतत वाचलं, हाताळलं जाणारं पान म्हणजे **वारली चित्रशैली...**

भिमबेटका चित्रशैली ते वारली चित्रशैली असा या कलेचा चढता प्रगत इतिहास आहे. अनेक आश्चर्यकारक, विस्मयकारक आकार, साध्या रेषा आणि भौमितिक आकार यांच्या माध्यमातून निसर्गाशी जोडलेलं नातं आजही मानवाच्या भटक्या जीवनशैलीचे, संस्कृतीचे आणि कलेचे नातं दर्शविताना दिसते.

आपण वारली कलेच्या माध्यमातून नव्या पिढीला आदिवासी संस्कृती आणि परंपरांची जाणीव करून देण्याचे व त्या मुलांना स्वावलंबनाचे धडे देण्याचे काम करत आहात. आपल्या या उपक्रमाचे कौतुक करावे तेवढे कमी आहे.

**आपल्या या उपक्रमास अनेक अनेक शुभेच्छा!**

**गडदे अण्णासाहेब हरिदास**
इंडोलॉजिस्ट, बीड.

annasahebgadade2000@gmail.com




**‘आयकॉनिक क्लब’**चा लोगो आणि पोस्टर


Organized by **ICONIC CLUB**

Dr. Vijay Bhatkar

Computer Literacy Programme

---------------------------------------------

*This certificate is awarded for successfully completing the 15-day's crash course under* ***‘Dr. Vijay Bhatkar Computer Literacy Programme’*** *in ........ grade.*

*Place:* ***Shri Samarth Vidyamandr, Solapur***

*Date:*

Programme Coordinator

Head Master

**डॉ. विजय भटकर कॉम्प्युटर लिटरसी प्रोग्राम सर्टिफिकेट**




आमचा **आयकॉनिक क्लब**



**आयकॉनिक क्लब च्या सातत्याने यश संपादन करणाऱ्या सदस्यांना या प्रकारचे गोल्ड मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.**




**विद्यार्थ्याने काढलेला वारली पेंटिंगचा अप्रतिम नमुना**



**विद्यार्थ्यांनी काढलेले वारली पेंटिंगचे अप्रतिम नमुने**




**'आयकॉनिक क्लब'च्या सदस्यांचे अप्रतिम फलक लेखन**

# क्लब ला भेटलेले मान्यवर

प्रसिद्ध ऑल इंडिया रेडिओ अँकर **मंजुषा गाडगीळ**, प्रसिद्ध कवी **मेहबूब शेख**, दैनिक सकाळचे संपादक **अभय दिवाणजी**, ज्येष्ठ समाजसेवक **पन्नालाल सुराणा**, पक्षीतज्ज्ञ **डॉ.निनाद शहा**, प्रसिद्ध बिजनेस वूमन **डॉ. सुहासिनी शहा**, अभिनेते **अमीर तडवळकर**, अर्जुन पुरस्कार विजेती आंतरराष्ट्रीय खेळाडू **शीतल खरमल**, डॉ. जागतिक स्तरावरील २% शास्त्रज्ञांपैकी एक असलेले **डॉ. अण्णासाहेब मोहोळकर**, भाभाचे ज्येष्ठ निवृत्त शास्त्रज्ञ **व्यंकटेश गंभीर**, सुप्रसिद्ध साहित्यिक **श्रुतीश्री वडकबाळकर**, प्रसिद्ध बालसाहित्यिक **मीरा शेंडगे**, प्रसिद्ध भरतनाट्यम नृत्यांगना **अरुंधती पटवर्धन**, बासरीवादक **गंधार अमीन**, कथ्थक नृत्यांगना **मेघना राव** यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. इ.


डॉ. सुहासिनी शहा


आंतरराष्ट्रीय खेळाडू शीतल खरटमल


शास्त्रज्ञ डॉ.अण्णासाहेब मोहोळकर


श्रुतीश्री वडकबाळकर



अभिनेते अमीर तडवळकर

## आयकॉनिक क्लब सदस्यता नोंदणी फॉर्म

# आयकॉनिक क्लब

### श्री समर्थ विद्यामंदिर, सोलापूर

**आयकॉनिक क्लब** हा आपल्या शाळेत २०१७ सालापासून आजतागायत सुरू आहे. यावर्षी देखील या क्लब सदस्यता नोंदणी सुरू केली आहे. खालीलपैकी आपल्या आवडीचे कोणतेही जास्तीत जास्त दोन क्षेत्र आपण निवडू शकता.

**नाव :** ____________________________________________

- **इयत्ता :** ________
- **तुकडी :** ________
- **संपर्क क्र :** ..........................

## आवडीचे क्षेत्र

- ○ संगणक साक्षरता
- ○ लाठी काठी
- ○ कॅरम
- ○ वक्तृत्व (भाषण)
- ○ बुद्धिबळ (चेस)
- ○ गायन (कराओके)
- ○ लेखन ( कथा /कविता / फलकलेखन / सुलेखन)
- ○ कला (नृत्य/चित्रकला/ रंगभरण/ वारली पेंटिंग)

मार्गदर्शक साक्षरी                                        विद्यार्थी स्वाक्षरी

## यांच्या समोर झाले उपक्रमाचे सादरीकरण



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा जेष्ठ नेते **मा. शरद पवार** यांच्या समोर उपक्रमाचे सादरीकरण




संसदरत्न खासदार **मा. सुप्रिया सुळे** यांच्या समोर उपक्रमाचे सादरीकरण करताना




महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा जेष्ठ नेते **मा. शरद पवार** यांच्या हस्ते सत्कार स्वीकारल्यानंतर

# अविस्मरणीय असे काही!






वेचक

## आम्हीच ठरवतो आमचे आदर्श

मुलांना एखाद्या 'रोल मॉडेलचे किंवा सुपर मॉडेलचे' प्रचंड आकर्षण असते. दर वेळी 'मुलांनी काय काय करावे' हे त्यांना सांगणे म्हणजे आपल्या सहनशक्तीची परीक्षा पाहण्यासारखे असते. अशा वेळी मुलाला 'तू काय कर' हे सांगण्यापेक्षा त्यांचे रोल मॉडेल काय काय करतात हे सांगितले की त्यातून नेमका संदेश मुलांना मिळतो. शाळेमध्येच अशी एक व्यवस्था निर्माण करावी, ज्याद्वारे उद्याचे 'आदर्श' चांगल्या पद्धतीने घडतील. यातूनच जन्म झाला 'आयकॉनिक क्लब'चा !

राजकिरण आत्माराम चव्हाण, श्री समर्थ विद्यामंदिर, सोलापूर.
संपर्क : ७७७४८८३३८८

विद्यार्थ्यांच्या मनात कोणता ना कोणता तरी स्वतःचा नायक, नेता, हिरो असतो. त्याला आदर्श मानून त्याच्यासारखे वागणे, चालणे, बोलणे, आपल्या प्रत्येक गोष्टी त्याच्यासारख्या करायला, त्याला फॉलो करायला आवडते. पण ते चांगल्या-वाईटाचा, प्रत्यक्ष परिस्थितीचा, त्यांच्या संघर्षाचा विचार न करता आयकॉन्सचे अनुकरण (किंवा अंधानुकरण) करताना दिसतात. त्याचे होणारे दुष्परिणाम महाभयंकर आहेत. या पार्श्वभूमीवर विविध क्षेत्रांची आवड असलेली मुले आयकॉन म्हणून शाळेतील सर्व मुलांसमोर उभे राहिल्यास निश्चितच त्या मुलांना त्यांचा एक नवीन आयकॉन मिळू शकेल. असा विचार मनात आला.


### पूर्वतयारी–नियोजन


'आयकॉनिक क्लब' स्थापन होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना शाळेत नियमित येण्याची गोडी लागण्याबरोबरच त्या करिता शाळेचे वातावरण पोषक कसे राहील हेसुद्धा पाहणे गरजेचे होते. यासाठी मुख्याध्यापक मल्लिनाथ स्वामी, संस्थेचे पदाधिकारी, माझ्या शिक्षक मित्रांशी चर्चा केली. त्यानंतर विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती अभिनेते अमीर तडवळकर, संपादक अभय दिवाणजी, डायट सोलापूर विज्ञानविषय सहायक बाळासाहेब वाघ, अक्षरमित्र अमित भोरकडे, पक्षीतज्ज्ञ डॉ. निनाद शहा, एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे, प्रिसिजन फाऊंडेशनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांच्याशी चर्चा केली.

सुरुवातीला मुलांना आवडीनिवडी काय आहेत?, त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रामधील कोण आवडते? कोण व्हायला आवडेल? अशा हलक्याफुलक्या प्रश्नांनी त्यांच्या आवडीनिवडी समजून घेतल्या. त्यांच्या मनात असलेले त्यांचे नायक, आयकॉन्स कोणते आहेत? याची

२६ | जानेवारी- फेब्रुवारी - मार्च २०२४ | शिक्षणगाथा

शासनाचे त्रैमासिक असलेल्या **शिक्षणगाथा** मध्ये या उपक्रमाची दखल घेण्यात आली.



## आयकॉनिक क्लब

राजकिरण आत्माराम चव्हाण
सहशिक्षक, श्री समर्थ विद्यामंदिर, सोलापूर.

प्रत्येकाच्या मनात कोणता ना कोणता तरी आदर्श असतो. शालेय मुलांसमोरही कोणी हिरो असतो; मात्र अनेकदा चुकून या आयकॉन्सचे अनुकरण (अंधानुकरण) होते. यातून अनेक दुष्परिणाम होतात. यासाठी राजकिरण चव्हाण यांनी श्रीसमर्थ विद्यामंदिर, सोलापूर इथे एक वेगळीच कल्पना अमलात आणली. त्यांनी शाळेतच असे आदर्श निर्माण होतील, याची व्यवस्था केली. याला नाव दिले, आयकॉनिक क्लब!
याद्वारे शाळेतील विविध कलागुण, क्रीडा यांत रस असलेल्या काही मुलांना प्रोत्साहन दिले. मुलांसमोर त्यांचे आदर्श कसे असावेत, याचा नियोजनबद्ध वस्तुपाठ या माध्यमातून दिल्यास शाळेतून खरोखरच अनेक 'हिरे' घडतील, हा विचार त्यामागे होता. या वर्षभरात विद्यार्थ्यांना आयकॉनिक क्लबच्या माध्यमातून विविध क्षेत्रांमध्ये काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. तज्ज्ञांचे मार्गदर्शन व विविध स्पर्धा, कार्यशाळा यांच्या माध्यमातून स्वतःला घडवत त्यातील अनेक विद्यार्थी शाळेतील विद्यार्थ्यांसमोर एक आयकॉन म्हणून तयार झाले आहेत.

'आयकॉनिक क्लब' हा उपक्रम 'श्री समर्थ विद्यामंदिर, सोलापूर' या प्राथमिक शाळेमध्ये राबवण्यात येतो. सोलापुरातील शास्त्रीनगर या झोपडपट्टीवजा परिसरामध्ये ही शाळा आहे. तसे पाहिले, तर एका बाजूला सोलापूर हे भारतातील 'स्मार्ट सिटी' म्हणून उदयाला आलेले शहर; पण शास्त्रीनगर व आजूबाजूचा परिसर पाहिला, तर तो आर्थिकदृष्ट्या मागास, कमकुवत व दुर्बल घटकांचा आहे. याठिकाणी हिंदी, उर्दू, मराठी, कन्नड, तेलुगू, कुंचिकोरवी अशा विविध भाषा व बोली बोलल्या जातात. परिसरातले लोक मोलमजुरी करून गुजराण करणारे आहेत. येथील पुरुष मंडळी अर्थात घरातील कर्तेमंडळी सकाळी कामानिमित्त घरातून लवकर निघून जातात, तर घरातील महिला घरकाम करत बहुदा बिडी वळण्याचे काम दिवसभर करत असतात. त्यामुळे आपल्या मुलांकडे लक्ष देणे, ती काय करत आहेत याचा अंदाज घेणे अशा महत्त्वाच्या बाबींकडे त्यांचे दुर्लक्ष होते. आपला

आयकॉनिक क्लब 57

**'नवोपक्रमांची नवलनगरी'** या पुस्तकात देखील आयकॉनिक क्लबला स्थान मिळाले आहे.

# अविस्मरणीय असे काही!



'आयकॉनिक क्लब' या उपक्रमाला **शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन ही १ लाख रु. ची पाठ्यवृत्ती** प्राप्त




**शरद पवार इन्स्पायर फेलोशिप वितरण सोहळा...**

यावेळी मा. शरद पवार, मा. अनिल काकोडकर, मा. सुप्रिया सुळे, मा. विवेक सावंत

# माध्यमांनी घेतलेली दखल

divyamarathi.com

**न्यूज ब्रीफ**

## समर्थ विद्या मंदिरात आयकॉनिक क्लबची वारली पेंटिंग कार्यशाळा

**सोलापूर** | शास्त्री नगर येथील श्री समर्थ विद्या मंदिरात आयकॉनिक क्लब अंतर्गत वारली पेंटिंग कार्यशाळा घेण्यात आली. शिक्षक राजकिरण चव्हाण यांनी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. यावेळी मुख्याध्यापक मल्लिनाथ स्वामी, संस्थेचे सचिव अरुण शिखरे, श्रुती शिखरे, महादेव चौरे, दिपाली शहाणे, दैवशाला उकिरडे, मंजूषा मुळे, कैलास कोरे, सुनील डांगे उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षकांनी आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## श्री समर्थ विद्यामंदिरात
### वारली पेंटिंगची कार्यशाळा संपन्न



सोलापूर जिल्ह्यातील शास्त्रीनगर येथील श्री समर्थ विद्यामंदिर येथे 'आयकॉनिक क्लब' अंतर्गत वारली पेंटिंग कार्यशाळेचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. या कार्यशाळेला शरद पवार इन्स्पायर फेलोशिपचे विजेते उपक्रमशील शिक्षक राजकिरण चव्हाण यांनी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.

विविध क्षेत्राचे भविष्यात नेतृत्व करू शकतील असे विद्यार्थी शालेय स्तरापासूनच घडवणे या अनुषंगाने 'आयकॉनिक क्लब'च्या कला क्षेत्राच्या अंतर्गत हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. या कार्यशाळेला शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यशाळेच्या सुरुवातीला राजकिरण चव्हाण यांनी वारली जमात त्यांचे जीवन, त्यांची चित्रकला या संदर्भात थोडक्यात माहिती सांगण्यात आली. त्याचबरोबर वारली समाजातील 'तारपा' नावाचे वाद्य देखील वाजवून दाखवले.

वारली चित्रकलेतल्या काही मूलभूत आकृत्या विद्यार्थ्यांना समजून सांगण्यात आल्या व त्यानंतर विद्यार्थ्यांना रेखाटण्यासाठी एक चित्र देण्यात आले. विद्यार्थ्यांनी देखील अप्रतिम वारली चित्रांची रेखाटने करून दाखवली. या उपक्रमातून मुलांच्या कलाविषयक आवडीला वाव मिळणार आहे. आज वारली पेंटिंग भारतातच नव्हे तर परदेशातही

सकाळ

## श्री समर्थ विद्यामंदिरच्या तीन विद्यार्थ्यांची 'इन्स्पायर अवॉर्ड'साठी निवड

सकाळ वृत्तसेवा

Solapur, Solapur Today
09/01/2023 Page No. 3

## श्री समर्थ शाळेच्या तिघांना इन्स्पायर अवॉर्ड

**सोलापूर** | भारत सरकारतर्फे आयोजित प्रतिष्ठित 'इन्स्पायर अवॉर्ड' साठी शालेय स्तरावरील नवकल्पना असणाऱ्या विद्यार्थ्यांची यासाठी निवड केली जाते. या वर्षीच्या सोलापुरातील श्री समर्थ विद्यामंदिरच्या सिमरन आरिफ मोमीन, सुशीला इमानुवेल गुमळे, कार्तिक विजय वडलाकोंडा या तीन विद्यार्थ्यांची पुरस्कारासाठी निवड झाली आहे. प्रत्येकी दहा हजार रुपये इतकी रक्कम या विजेत्या विद्यार्थ्यांना मिळणार आहेत.

भारताने जगाचे नेतृत्व करावे व विश्वगुरू बनावे यासाठी भारत सरकार इनोव्हेशन अर्थात नवकल्पनेवर लक्ष केंद्रित आहे करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून गेल्या काही वर्षांपासून भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून हा उपक्रम हाती घेण्यात येत आहे. राजकिरण चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेत आयकॉनिक क्लब अंतर्गत आविष्कार कार्यशाळेतून मुलांना मार्गदर्शन करण्यात आले.



कार्तिक



सुशीला गुमळे



सिमरन मोमीन

यशाबद्दल शाळेचेमुख्याध्यापक मल्लिनाथ स्वामी, संस्थेचे अध्यक्ष रवींद्रकुमार शिखरे, सचिव अरुण शिखरे व शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# THANK YOU!

Yours faithfully

**SHRI. RAJKIRAN ATMARAM CHAVAN**
(M.A., D.Ed., DSM, MCJ, CPCT, GVD)
**Website :** www.srujanshilshikshak.com, **Email ID :** srujanrajkiran@gmail.com

**SCHOOL**

**SHRI SAMARTH VIDYAMANDIR, SOLAPUR**
TALUKA- NORTH SOLAPUR, DIST.- SOLAPUR, STATE- MAHARASHTRA
**U DISE CODE:** 27301303101, **Email ID:** shrisamarthvm@gmail.com